


**मांजरी, पुणे : राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र येथे सामंजस्य करार कार्यक्रमात (डावीकडून) डॉ. अजय उपाध्याय, डॉ. आर. जी. सोमकुंवर, राजेंद्र वाघमोडे.**

# शेती उत्पादनाचे मूल्य वाढविणे गरजेचे

## डॉ. सोमकुंवर यांचे प्रतिपादन

**पुणे:** ''शेती उत्पादनाचे मूल्य वाढविल्यास ग्रामीण भागातील अर्थकारणाला निश्चितच गती येईल,'' असे प्रतिपादन राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्राचे संचालक डॉ. आर. जी. सोमकुंवर यांनी केले. राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र पुणे (मांजरी) येथे आयोजित सामंजस्य करार कार्यक्रमात ते बोलत होते.

''फळबागायतीचे वाढते क्षेत्र लक्षात घेता द्राक्ष, आंबा, डाळिंब, पेरू, सीताफळ, चिंच इत्यादीवर प्रक्रिया करून मूल्यवर्धन करणे गरजेचे आहे,' असे डॉ. सोमकुंवर यांनी सांगितले. उच्च प्रतीच्या मालाचे मार्केटिंग झाल्यानंतर राहिलेल्या मालाचे मूल्यवर्धन करण्यासाठी शेतकरी उत्पादक कंपन्यांना राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्राचे कृषी व्यवसाय नावीन्यता केंद्र मार्गदर्शन करीत असते. या वेळी इंदापूर व जालना येथील शेतकरी उत्पादक संघाबरोबर सामंजस्य करार करण्यात आला. या वेळी डॉ. अजय शर्मा, डॉ. अजय उपाध्याय, डॉ. अहमद शब्बीर, श्री रोहित पलघडमल, डॉ. राजीव काळे, शेतकरी उत्पादक संघाचे मुख्य प्रवर्तक दीपकबापू करगळ, राजेंद्र वाघमोडे, शंतनू जगताप, भीमराज खरात, चंद्रकांत साळुंके, विजय जगताप, संपत बुटे, धनाजी गोफणे, सुजित कुदळे, लीना सावंत उपस्थित होते.